अनुप साळगांवकर



# बाळबोध

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# बाळबोध

लेखक : अनुप अनिल साळगांवकर

# बाळबोध

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# बाळबोध

अनुप अनिल साळगांवकर

मोबाईल :९८६९४०४९५३

wataspp ७७१८९६८९५३

ई मेल : salgaonkar.anup@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २७ जुलै २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



मनोगत

काय सांगू ...? आणि किती सांगू ...??

हे विश्व शब्दांचं आहे. जिथे शब्द संवाद साधतात, शब्द ठाव घेतात, शब्द चित्र रंगवतात, शब्द निःशब्द होतात.

महाविद्यालयात असताना एकदा ओघानं "मृत्यूंजय" हे पुस्तक हातात पडलं. अगदी तेव्हापासूनच वाचनाची आवड निर्माण झाली. या पुस्तकांच्या विश्वात मन रमू लागलं. बालसाहित्य लिहायची सुरवात साधारण २०१५ साली झाली. महाराष्ट्र टाइम्स, मुंबई च्या वर्तमान पत्रात "सांगा ना गोष्ट" या सदरात पहिली गोष्ट छापून आली, फार आनंद झाला.

आपण काहीतरी लिहिणं आणि वाचकांना ते आवडणं या पेक्षा सुख वेगळं ते काय ?

घरच्यांकडून, थोरा -मोठ्यांकडून , मित्र -मत्रिणींकडून खूप कौतुक झालं. लिहिण्याची प्रेरणा ही याच साऱ्यांनी  दिली. एका गोष्टीच्या पंधरा गोष्टी कधी लिहून झाल्या माझं मलाच कळलं नाही. त्या पुस्तक रूपात सर्व परिचित व्हाव्यात ही मनोमन इच्छा होतीच.

"मुलं ही देवाघरची फुलं " आजची मूल उद्याचे सुजाण नागरिक बनणार आहेत, म्हणूनच बाल मनावर चांगले, उत्कृष्ट संस्कार व्हावेत हा या प्रत्येक गोष्टी मागचा प्रांजळ हेतू आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान यांनी सुरु केलेला हा ई-बुक उपक्रम अगदी स्तुत्य आहे. माझ्यासारख्या अनेक नवीन कवी -लेखकांना मिळालेलं हे उत्कृष्ट व्यासपीठ आहे. त्यांनी दिलेल्या प्रेरणेबद्दल, माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी या संपूर्ण संघाचा अत्यंत ऋणी आहे.

या पुस्तकातल्या गोष्टी केवळ लहान मुलांसाठीच नाहीत, तर त्या तुमच्या माझ्यासारख्या अनेका जेष्ठा-श्रेष्ठांसाठीही आहेत. या गोष्टींमधून आपण काही शिकलात, एखादं सत्कर्म केलंत, तर ते यश नक्कीच माझं असेल.

शुभं भवतु .... कल्याणमस्तू

अनुप साळगांवकर

९८६९४०४९५३

wataspp ७७१८९६८९५३

# अर्पण पत्रिका

माणूस म्हणून मला घडवणाऱ्या

माझ्या मोठ्या भावाला आणि आई -वडिलांना समर्पित

# कथाक्रम


1. मानवतेचं झाड
2. पावसाशी मैत्री
3. उडे परी .... अधांतरी
4. कावळा
5. जीवनदायी नदी
6. काळे ढग- पांढरे ढग
7. प्रायश्चित
8. निर्मिती
9. सृष्टी सौंदर्य
10. दोन कळया
11. शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ
12. शर्यत मैत्रीची...!!!!
13. निसर्ग नियम
14. "इंद्रधनुष्य"
15. कष्टाचे बळ , मिळते फळ

# मानवतेचं झाड

उन्हाळ्याची सुट्टी संपून नुकतीच आराधनाची शाळा चालू झाली होती. वडिलांची नोकरी फिरतीची असल्यामुळे सतत दोन वर्षांनी तिची शाळा बदलायची. नवीन शाळा , नवे वर्ग, नव्या बाई, मित्र मैत्रिणी सुद्धा नवे, सगळेच नवे चेहरे पाहून ती नेहमीच गोंधळून जायची. लहानपणापासूनच तशी ती फार हुशार पण सततच्या या बदलामुळे स्वभावाने थोडी मितभाषी आणि बुजरी झाली होती. नव्या शाळेत कुणी जीव भावाच्या मैत्रिणी नाहीत, घरी आलेल्या कुणा नातेवाईकांशी बोलणे नाही की, आपलेपणाने कुणा मित्रांकडे खेळायला ही जाणे नाही. ती, तिची आई आणि वडील आणि शाळा एवढंच तिचं विश्व, त्यामुळे तिच्या आईला तिची खूप काळजी वाटायची.

नव्या शाळेत शिकता शिकता त्या शाळेच्या बाई तिला फार आवडू लागल्या. बाईंना आराधनाची अडचण चांगलीच समजली होती त्यामुळे त्या तिच्याकडे अधिक लक्ष देत होत्या.

असाच एकदा शाळेत आषाढी एकादशी निमित्त वृक्षरोपणाचा कार्यक्रम होता. सगळया विद्यार्थ्यांना शाळेच्या आवारात एक छानसं झाड लावण्याची संधी मिळणार होती

आराधना निसर्गप्रेमी असल्यामुळे तिला झाडे, वेली, रंगीबेरंगी फुले यांचं फार आकर्षण. घरातल्या वडिलांनी फुलवलेल्या छोटेखानी बागेत तासन-तास त्या फुलं पानांत रमायची, एखाद्या नवीन फुलाबद्दल आईकडून माहिती मिळवायची.

वृक्षारोपणाच्या दिवशी तिच्या हातात  बाईंने पानफुटीचं झाड दिलं, जे तिने या पूर्वी कधीच पाहिलं नव्हतं. ते झाड पाहून तिला खूप आनंद झाला. किती वेगळं आणि नावीन्य पूर्ण झाड होत ते. त्या झाडाबद्दल अधिक माहिती मिळवण्याच्या उत्कंठेने तिने बाईंना अनेक प्रश्न विचारले बाईंनीही साऱ्या प्रश्नांची तिला उत्तरे दिली आणि म्हणाल्या, प्रत्येक झाड, त्या झाडाचं प्रत्येक पान हे वेगळं आहे.  प्रत्येकाला आपला आकार आहे, रंग आहे, गंध आहे. आता या पानफुटीच्या झाडाचं पान एकमेकाला लागून उगवतं, परस्परांना आधार देतं. आपल्या वर्गातल्या मित्र मैत्रिणींच, आजूबाजूच्या लोकांचंही असंच असतं प्रत्येक व्यक्ती वेगळी आहे, प्रत्येकाला आपला स्वभाव आहे. आपण सगळ्याशी मैत्री केली पाहिजे, सगळ्यांना आपलंसं करून घेतलं पाहिजे.

आराधनाला हे सगळं पटलं तेव्हा तिने वर्ष संपायच्या आत सगळ्यांची मैत्री केली आणि जेव्हा तिने वार्षिक परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला तेव्हा तिचं कौतुक करायलाही सगळ्या वर्गाने टाळ्यांच्या गजरात तिचं अभिनंदन केलं

म्हणूनच मित्रहो सगळ्यांशी मैत्री करा, सगळ्यांना आपलंसं करा आणि आयुष्य सोपं करा.

# पावसाशी मैत्री

पाऊस आणि धरणी एकमेकांचे खूप छान आणि जुने मित्र होते. पाऊस दूर आभाळाच्या देशातून दरवर्षी धरणीला भेटायला यायचा, मनमोकळं बरसून धरणीला ओलंचिंब करायचा. तो आला की धरणीलाही खूप आनंद व्हायचा. तिच्या डोंगररांगा हिरव्यागार दिसायच्या, काडेकपारीतून फेसाळ धबधबे आनंदाने उचंबळून वाहू लागायचे, शेतात इवली इवली रोपे वाऱ्यावर डोलू लागायची आणि हे सारं पाहून धरणी तृप्त व्हायची. पण एका वर्षी पाऊस ठरलेल्या वेळेत आला नाही, आपला मित्र आपल्याला विसरला कि काय ??? म्हणून धरणीला त्याचा खूप राग आला, आणि जेव्हा तो भेटायला ढग घेऊन आला तेव्हा उशीरा येण्यावरून धरणीचं आणि पावसाचं जोरदार कडाक्याचं भांडण झालं. " पुन्हा तुला भेटायला येणार नाही " पाऊस चिडून म्हणाला आणि निघून गेला. "गेला तर जाऊ देत" असं मनात म्हणून धरणी सुद्धा पावसावर रुसून बसली.

असेच काही दिवस मग महिने उलटून गेले, रुसून बसलेल्या धरणीचा सगळा मेकअप बिघडला, नदी-नाले सुकून गेले, झाले-वेली कोमेजून गेल्या, शेते ओसाड पडली, जमिनीची धूप वाढली आणि जमिनीला तडे जाऊ लागले, धरणीचे फार हाल झाले. पावसावाचून दिवस ढकलणे खूप कठीण होऊ लागले, पावसाने परत यावे म्हणून धरणी मनोमनी याचना करू लागली.

पाऊस बिचारा भोळा, दूर आभाळातून पाऊस हे सारे काही पाहत होता. ओसाड धरणाचे दुःख पावसालाही सहन झाले नाही त्याला तिची खूप दया आली. आपल्या लाडक्या मैत्रिणीला भेटण्यासाठी त्याचेही मन आतुर झाले मग त्याने मागचा पुढचा कसलाही विचार न करता ढग केले गोळा आणि वाऱ्यावर स्वार होऊन तो धरणीच्या भेटीला आला. प्रचंड विजांचा कडकडाट करत तो धरणीला भेटला आणि जोरदार बरसला.

त्याच्या त्या ओल्या स्पर्शाने धरणी शहारली, तहानलेली धरणी पुन्हा एकदा तृप्त झाली, आपल्या मदतीला पाऊस न बोलावता आला याची जाणीव झाली तेव्हा तिच्या डोळयात पाणी आले आणि म्हणाली , "पुन्हा नको भांडू, माझ्या पासून दूर राहून माझे असे अश्रू नको सांडू" . दोघे एकमेकांना भेटले तेव्हा एकमेकांकडे पाहून दोघांचेही मन आले भरून, काय उपयोग झाला उगाच भांडण करून. तेव्हापासून दोघांनीही ठरवले कारण काहीही असो या पुढे कधीच भांडायचे नाही. आणि तेव्हापासून आजपर्यंत दरवर्षी न चुकता, न बोलावता पाऊस धरणीच्या भेटीला येतो. वर्षोनुवर्षे जपलेल्या मैत्रीची आठवण करून देतो. म्हणूनच मित्रहो आपले मित्र कितीही दूर गेले तरी ते आपलेच आहेत, त्यांच्या मदतीसाठी आपण नेहमीच तयार असले पाहिजे.

## उडे परी .... अधांतरी

फार जुनी गोष्ट आहे. खूप खूप वर्षांपूर्वी जेव्हा जगाची उत्पत्तीच झाली नव्हती.

जेव्हा पृथ्वीवर कोणत्याच प्राण्याचं अस्थित्व नव्हतं.

मानवाने तर या जगात पाऊलच रोवलं नव्हतं, तेव्हाची ही गोष्ट.

तेव्हा सगळ्या सुंदर पऱ्या पृथ्वीवर रहायच्या.

दिवसभर इकडे - तिकडे एकत्रच फिरायच्या, निसर्गाचा मनमुराद आनंद लुटायच्या आणि फिरून फिरून दमल्या कि आभाळ पांघरून झोपायच्या.

असंच एकदा सहज फिरता फिरता त्या एका खडकाळ प्रदेशात येऊन पोहोचल्या.

निसर्गाचं सौन्दर्य पाहत चालता चालता अचानक एका सुंदर परीला ठेच लागली आणि ती पडली.

परीच्या पायात एक तीक्ष्ण दगड आला होता.

परीला लागलेली ठेच पाहून जमिनीवरचा तो दगड दुःखाने विव्हळला.

त्या दगडाचं दुःख पाहून परी म्हणाली, "अरे ... तू तर एक निर्जीव दगड, तुला कशी झाली परी जड ???"

परीच्या प्रश्नावर दगड उत्तरला , "हो, बरोबर मला तू जड नाहीस आणि मी माझ्यासाठी मुळी विव्हळलोच नाही, मी तुमच्या सार्‍यांच्या नाजूक पायाला झालेल्या जखमा पाहून दुःखी झालो."

दगडाचे बोलणे ऐकून सार्‍या पर्‍यांनी आपापले पायाचे तळवे पहिले तेव्हा त्यांना दिसल्या त्या गंभीर जखमा, ज्या जखमांमधून रक्त येत होत.

सगळया पर्‍यांना आपण दगडावर उगाच रागावलो याची जाणीव झाली त्यांनी दगडाची माफी मागितली.

आपल्याला जखमा देणार्‍या पृथ्वीवर पुन्हा पाऊल ठेवणार नाही, अशी सगळया पर्‍यांनी मिळून शपथ घेतली आणि आभाळी उडी घेतली.

तेव्हापासून प्रत्येक नाजूक परी

उडू लागली अधांतरी.

# कावळा

एका घरात एक आजीबाई एकटाच राहत होत्या. कुणीही नातेवाईक नाही कि कुणी सगेसोयरे नाहीत.

दिवसभर त्या घरात एकट्याच असायच्या. वेळ घालवण्यासाठी खिडकीपाशी उभं राहायच्या, खिडकीत येणाऱ्या प्रत्येक पक्षांशी बोलायच्या, त्यांच्या आवडीची फळे, खाऊ त्यांना खाऊ घालायच्या. कावळे दादांची आणि आजीची तर खूप छान गट्टी जमली होती. कावळेदादा नेहमीच ठरलेल्या वेळेवर यायचे, काव काव करून आपण आल्याची वर्दी द्यायचे, आजीने ठेवलेला सगळं खाऊ फस्त करायचे आणि भुर्रकन उडून जायचे. आजीलाही या पक्षांचा खूप आधार वाटत होता.

त्या एकट्या राहतायत हे एका चोराच्या नजरेस पडलं, दुपारची कमी वर्दळ पाहून एक दिवस एका भुरट्या चोराने त्यांच्या घरी चोरी करायची ठरवली

दारावरची बेल वाजऊन पोस्टमन अशी हाक दिली. आजीबाईंनी ती हाक ऐकून दार उघडले तेव्हा क्षणाचाही विलंब न करता तो चोर घरात शिरला, आजी बाईंना धक्का बुक्की करून घाबरवू लागला. सगळे सामान अस्ताव्यस्त करून काही मौल्यवान सापडते आहे का ते पाहू लागला. तेवढ्यातच आजीचे लाडके कावळेदादा भूक भागवण्यासाठी खिडकीपाशी आले. काव काव करून देखील आजी खाऊ देत नाही म्हणून घरात शिरले तेव्हा पाहताक्षणी त्यांना आजी अडचणीत सापडलीय हे लक्षात आले. कावळे दादांनी जोरात काव काव ओरडून आपल्या सर्व सग्या-

सोयऱ्यांना गोळा केले आणि एकाएकी त्या चोरावर हल्ला चढवला. अचानक झालेल्या पक्षी हल्ल्याने चोर चांगलाच गांगरुन गेला. त्यात आजीच्या लाडक्या कावळयाने आपल्या तीक्ष्ण चोचीने त्या चोराचा एक  डोळाच फोडला. वेदनेने विव्हळणाऱ्या चोराने मग त्या फुटलेल्या डोळयावर हात झाकून आजीबाईंच्या घरातून धूम ठोकली आणि पळून गेला. असे कावळे दादाच्या प्रसंगावधानाने आजीची चोराच्या तावडीतून सुखरूप सुटका झाली.

म्हणूच मित्रांनो प्राणी मात्रांवर दया करा. त्याची परतफेड ते आपल्यापरीने कशी करतील आपण कल्पनाही करू शकत नाही



# जीवनदायी नदी

एक नदी अनेक गावं , शहरं आणि प्रांतांचा प्रवास करत अविरत वाहत असते. खळखळ आवाज करून नाद करत असते. स्वच्छ, मधुर पाणी साऱ्यांना निस्वार्थ देत असते.

अनेक प्राणी, पक्षी आपली तहान भागवण्यासाठी नदी तीरावर येत असतं, पाणी पिऊन तृप्त होऊन परतत असतं.

असेच एकदा झाडावरची रसाळ फळे खाऊन पोट भरल्यावर पाणी पिण्यासाठी पाणवठ्यावर येत असताना खूप साऱ्या पक्षांनी आपल्या चोचीतून अनेक फळझाडे आणि फुलझाडांच्या बिया आणल्या, पाणी पितापिता त्या साऱ्या बिया नदी पात्रात सांडून गेल्या.

नदीने आपल्या स्वभावानुसार त्या बियांचा स्वीकार केला, त्यांना आपल्या प्रवाह सोबत वाहत वाहत एका सुपीक प्रदेशात घेऊन गेली तिथे किनाऱ्यावर त्यांना रुजवलं. मऊसूत किनाऱ्यालगतची माती त्यांना आधार देऊ लागली, सूर्य किरणांच्या वर्षावात त्या बियांना अंकुर फुटले, त्याची रोपटी तयार झाली, ती वाढू लागली. वर्षामागून वर्ष सरू लागली, नदीच्या पाण्यावर मुळे खोलवर रुजू लागली, झाडे वाढून त्याचे भलेमोठ्ठे वृक्ष तयार झाले. आता परिस्थिती बदलली हे मोठाले वृक्ष परोपकाराची परतफेड म्हणून सर्व पक्षी-प्राण्यांना सावली देऊ लागले, उन्हा - पावसाचं त्यांचं संरक्षण करू लागले, भूक भागवण्यासाठी आपली फळे देऊ लागले,

घरटे बांधण्यासाठी आधार देऊ लागले. पण पक्षी किंवा प्राण्यांमार्फत घर बांधण्यासाठी वापरण्यात येणारे झाडाचे कोणतेही पान, कोणतीही फांदी, कितीही वजनदार लाकूड पाण्यात पडल्यावर पाण्यात बुडत नव्हतं. ते तरंगून वर येई. दोस्तहो असं का होतं माहितीय ?

ज्या नदीच्या पाण्याने आईच्या मायेने अनेक वृक्षांना छोट्या बीजापासून मोठं केलं होतं तेच नदीचं पाणी त्या झाडाला, त्याच्या पानाला,त्याच्या कोणत्याही फांदीला कसं काय बुडू देईल म्हणूनच मित्रहो लहानपणापासून आपल्याला घडवणाऱ्या आपल्या आई-वडिलांना,शिक्षकांना आपल्या मित्रमैत्रिणींना कधीही विसरू नका कारण आपल्याला घडवणारे हात आयुष्यात परिस्थिती कोणतीही असो आपल्याला कधीच बुडवणार नाहीत.

ते हात असेच आपल्यावर नदीसारखा अविरत कौतुकाचा वर्षाव करत राहतील.

## काळे ढग- पांढरे ढग

इंद्र देवाच्या दरबारात दोन गंधर्व गायक होते. दोघेही आपापल्या सुरांचे पक्के आणि गाण्यात तरबेज.

दोघांकडे सुरांची अशी काही जादू जी समोरच्याला मंत्रमुग्ध करेल, इंद्र दरबारी दोघे अप्रतिम गाणं सादर करायचे.

दरबारातीलच नाही तर स्वर्गलोकीचे सर्व देवही भान हरपून त्यांचं गाणं ऐकायचे

दोघांचंही देवलोकी भरपूर कौतुक व्हायचं.

त्या दोघांत फक्त एक फरक होता, तो असा कि एक गंधर्वगायक रंगाने काळा आणि एक गोरा.

त्यातल्या गोऱ्या गायकाला स्वतःच्या दिसण्याचा, मिळणाऱ्या सन्मानाचा फारच अभिमान झाला.

हाच अभिमान हळू हळू गर्वात बदलला. स्वतःपुढे तो सर्वांना कमी लेखू लागला, पदोपदी सर्वांचा अपमान करू लागला.

याउलट काळया रंगाचा गायक फारच शांत आणि सुस्वभावी होता.

एक दिवस इंद्रदेवाने त्या दोघांची एकदा परीक्षा घ्यायची ठरवलं.

राजगायकाच्या पदासाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धेसाठी दोघांनाही दरबारात बोलावून घेण्यात आलं.

जो गायक आपल्या गाण्याने धरती मातेला प्रसन्न करेल त्याला राजगायकाचे पद, सन्मान आणि इच्छित वर देण्यात येईल अशी घोषणा झाली.

सुरांची मैफिल सजली आणि या दोघात स्पर्धा रंगली. तबल्यावर थाप पडली, सतारीवर साज चढला तसे दोघांचेही सूर लागले. दोघांपैकी कुणीच माघार घेईना.

गोऱ्या रंगाच्या गंधर्व गायकाच्या गळयातून अहंकाराने बाहेर पडलेले उग्र सूर धरतीवर वणव्यासारखे पसरले, अनेक  झाडे जळून खाक झाली, वृक्ष उन्मळून पडले आणि धरतीला तडे जाऊ लागले.

या उलट काळया रंगाच्या गंधर्व गायकाचे शांत सूर आभाळाला भिडले, आभाळ दाटून आले आणि पावसाच्या सरींनी धरती सुखावली.

निर्विवाद काळया गायकाला राजगायकाचा सन्मान मिळाला आणि गोऱ्या गायकाचा अहंकार धुळीला मिळाला

इंद्रदेवाने धरतीची विडंबना केलेल्या गोऱ्या गायकाचे पांढरे ढग तयार केले. जे आजही उन्हात उभं राहून आपल्या अहंकाराचं प्रायश्चित करत आहेत.

याउलट काळ्या गायकाचे देवाने काळे ढग तयार केले जे आजही आभाळी दाटून येतात, गडगडून सूर छेडतात, मनसोक्त बरसतात आणि सृष्टीला शीतलता प्रदान करतात.

म्हणूनच मित्रहो आपल्या दिसण्याचा किंवा असण्याचा कधीही गर्व करू नये. आपल्या जवळ असलेली कोणतीही विद्या आणि कला ही विनयेन शोभते.



# प्रायश्चित

मर्कट नावाचा होता एक राजा, खूप सुखी त्याची प्रजा.

प्रजा होती सुखी पण राजा होता दुःखी.

त्याच्या दुःखाचे कारण काय? तर जन्मत:च राजाला होती एक लांब वनरासारखी शेपटी. आपली शेपटी कुणालाही दिसू नये म्हणून राजाला नेहमीच प्रयत्नशील राहावे लागे, सिंहासनावरही बसताना राजाला शेपटी लपवून बसावे लागे. ती भली मोट्ठी शेपटी लपवण्याचा राजाला फार वीट आला होता. प्रजेला भेटण्याचे टाळण्यासाठी तो माहिन्यातून एकदाच राजदरबार बोलवत असे आणि कामाशिवाय कुणालाही भेटत नसे.

लहानपणापासून अनेक वैद्य, हकीम झाले पण राजाला काही गुण येईना आणि त्या शेपटीचा नायनाट काही केल्या होईना.

एके दिवशी राजाला राज्याबाहेर एक महान विद्वान साधू महाराज आलेत अशी सेवकांकडून राजाला बातमी मिळते. बातमी मिळताच राजा स्वतः त्या गुरूमहाराजांकडे जातो, त्यांचे शिष्यत्व स्विकारतो, त्यांची सर्वतोपरी सेवा करतो.

राजाच्या सेवेला प्रसन्न होऊन गुरुमहाराज राजाला त्याच्या पूर्वजन्माची आठवण करून देतात.

ज्या जन्मात राजा क्षत्रिय होता आणि शस्त्रविद्या शिकताना त्याने अनेक वानरांची शेपटी तलवारीने धडा वेगळी केली होती. त्या वानरजातीचा शाप म्हणून राजाचा या जन्मी वानर योनीत जन्म झाला आणि त्याला जन्मापासून लाभली ती ही वानरांसारखी भली मोट्ठी शेपटी.

यावर प्रायश्चित काय ??? म्हणून महाराजांनी राजाला वानरांचे आणि अन्य वन्य प्राण्यांचे पुनर्वसन करण्याचे आदेश दिले. राजाने गुरूंची आज्ञेचे काटेकोरपणे पालन केल.

राज्या शेजारी अनेक झाडे लावून राजाने एक जंगल निर्माण केले, अनेक वानर आणि त्या सोबत सगळेच प्राणी, पक्षी त्या जंगलात राहायला येऊ लागले, आप-आपला घरोबा वाढवू लागले. राजा स्वतः जातीने सगळयांची काळजी घेत असे. जशी जशी वानरांची संख्या वाढू लागली तशी तशी राजाची शेपटीही हळू हळू छोटी होऊन नाहीशी झाली. अशाप्रकारे केलेल्या पापाचे प्रायश्चित घेऊन राजा शाप मुक्त झाला आणि राज्यात आनंदी आनंद झाला.

म्हणूनच मित्रहो चांगली कर्म करा. कुणालाही दुखावू नका, मुक्या प्राणी मात्रांवर दया करा.

# निर्मिती

एका हिरव्यागार रानात, एका टुमदार झाडावर एका चिऊताईने बारीक काटेकुटे, सुके गवत, कापूस, पिसे गोळा करून एक छानसं घर बांधल होतं. ती आणि तिची दोन पिल्ले त्या घरट्यात खूप आनंदाने राहत होती. दिवसा मागून दिवस सरत होते. पिल्ले हळू हळू मोठ्ठी होत होती. चिऊताई आपल्या पिल्लांना स्वसंरक्षण आणि स्वावलंबनाचे धडे देत होती. ती गोजिरवाणी पिल्लेही आपल्या आईचे अनुकरण करत होती.

एक दिवस पहाटे चिऊ आपल्या पिल्लांन सोबत अन्न शोधण्यासाठी घरट्या बाहेर पडते, सायंकाळी घरी येउन पाहते तर अचानक सा-या जंगलभर वणवा पसरलेला असतो. आगीचे नुसते डोंब उसलेले असतात. चिऊताईच्या राहत्या झाडाची आणि घरट्याची राखरांगोळी झालेली असते. पिल्ले हे सारं निसर्गाचं रुद्र रूप पाहून खूप घाबरून जातात आणि चिऊकडे केविलवाण्या नजरेने पाहू लागतात.

चिऊ आपल्या पिल्लांना स्वावलंब शिकवण्याची ही खूप छान संधी आहे असा विचार करते आणि काहीही न बोलता पिल्लांनसोबत दुसऱ्या एका जवळपासच्या रानात निघून जाते. तिकडे एका उंच, डेरेदार झाडाची आपल्या घरट्यासाठी निवड करते. रानोरान भटकून काटेकुटे, सुके गवत, कापूस, पिसे शोधण्याचा प्रयत्न करते. तिच्या पाठोपाठ पिल्लेही नवे घरटे बनवण्याच्या तयारीला लागतात. आणि बघता बघता एक छानसं घरटं आकाराला येतं. चिऊताईला घरटे

बांधणीच्या कामात आपल्या पिल्लांनी केलेल्या मदतीचे फार कौतुक वाटते आणि तिला पिल्लांच्या चीवचीवटात जाणवतो तो स्वनिर्मितीचा आनंद.

म्हणूनच दोस्तहो कितीही कठीण परिस्थिती असेल तरी घाबरून जाऊ नका.  धैर्यने संकटाचा सामना करा.

परिस्थिती आपल्या हातात नसली तरी प्रयत्न करणे आपल्या हातात आहे हे कधीही विसरू नका.

# सृष्टी सौंदर्य

दूर आभाळाच्या देशात अनेक प-या राहत होत्या. सगळयाच अगदी सुंदर, प्रसन्न आणि सदैव आनंदी.

या सगळयांत आपलं वेगळेपण जपत होती, ती सोनेरी केसांची परी. पांढरा शुभ्र पायघोळ झगा, गुलाबी गाल, लाल चुटूक ओठ आणि कुणालाही मोहून टाकतील असे लांबसडक मोकळे सोनेरी केस.

अप्रतिम सौंदर्य आणि सगळयांना आपलसं करेल असा उत्तम स्वभाव म्हणूनच ती सगळयात वेगळी असली तरी सगळयांची लाडकी.

एके दिवशी सगळया प-या मिळून वा-यासोबत आभाळी लपंडाव खेळत असतात. अनेक प-या स्वतः भोवती काळे पांढरे ढग गुंडाळून त्यात लपून बसतात.

वारा साऱ्या पऱ्यांचा शोध घेण्यासाठी सैरा -वैरा पळत सुटतो. सोनेरी केसांची परीही एका क्षणाचाही विलंब न करता मोठाल्या ढगात उडी मारते आणि स्वतःला लपवून घेते.

थोड्या वेळाने सोनेरी परी ज्या ढगात लपून बसलीय त्य ढगात हळू हळू पाणी शिरू लागते आणि तो ढग पाण्याने जड होऊ लागतो. एकटी सोनेरी परी फार गोंधळून जाते.  बिचारी त्या ढगातून बाहेर पडण्याचा खूप प्रयत्न करते पण तिला मार्गच सापडत नाही.

प-यांचा शोध घेणारी वा-याची एक जोरदार थंड झुळूक येते आणि ढगात साठलेले पाणी थेंब बनून धरतीवर झेप घेते.

एका थेंबात अडकून सोनेरी परीही प्रचंड वेगाने जमिनीकडे झेपावते.

तो थेंब निळयाशार समुद्रात पडतो. इतका विशाल समुद्र, त्यातले सागरी जीव या सा-याला घाबरून,

या सगळयांपासून स्वतःचा जीव वाचवत सोनेरी परी एका शिंपल्यात जाऊन बसते. हळूहळू तो शिंपला आपले तोंड बंद करतो आणि परी त्यात कायमची अडकून पडते.

आपण अडकून पडलोय या दु:खापेक्षा आपलं सौंदर्य अबाधित राहावं म्हणून देवाकडे प्रार्थना करते.

अनेक वर्ष उलटून जातात आणि एके दिवशी तो शिंपला आपले तोंड उघडतो तेव्हा अडकून पडलेल्या त्या सोनेरी परीचा एक सुंदरसा मोती झालेला असतो.

आजही समुद्रतळाशी अनेक शिंपल्यात मोती सापडतात. स्वतःच्या अपरिमित सौंदर्याने आपल्याला मोहात पाडतात.

म्हणूनच मित्रांनो सृष्टी सौंदर्याने जे आपल्याला मिळेल ते आपण जपायला हवं.

## दोन कळया

एका तळयाकाठी एक सुंदर बगीचा होता. विवधरंगी फुलांनी बहरलेल्या बगीच्यात माळीकाकांनी एक नवीनच गुलाबाचं रोपटं लावलं होतं.  माळीकाका संपूर्ण बगीच्याची खूप काळजी घेत, विशेषतः या नवीन गुलाबाच्या रोपट्याची. दिवसागणिक गुलाबाच्या रोपट्याची छान वाढ होत होती, एके दिवशी झाडांना पाणी देताना माळी काकांना त्या गुलाबाच्या रोपट्याला पाहुन  खूप आंनद झाला, त्या रोपट्याला पहिल्यांदाच दोन कळया आल्या होत्या. माळीकाका या कळया फुलण्याची आतुरतेने वाट बघू लागले. त्या कळयाही फुलण्याच्या तयारीत असताना अचानक एका रात्री पहिल्या कळीला कुणाच्यातरी रडण्याचा आवाज आला. तिने आवाज ओळखीचा वाटतो म्हणून आजूबाजूला पाहले तर दुसरी कळी बिचारी पानाआड तोंड लपवून हुंदके देऊन रडत होती. पहिलीने विचारपूस केल्यावर दुसरी कळी म्हणाली " उद्या आपण उमलणार आणि उद्याच आपल्या आयुष्याचा शेवटचा दिवस ठरणार. आपलं एक दिवसाचं आयुष्य निरर्थक संपणार याच मला फार वाईट वाटतं. "  पहिली कळी गालात हसते आणि दुसरीला समजावताना म्हणते, " आपले आयुष्य संपणार याचे वाईट वाटून घेण्यापेक्षा आपण थोडा वेगळा विचार करूया. उद्या आपण जेव्हा उमलू तेव्हा आपल्या सुगंधाने अनेक फुलपाखरे आपल्याकडे आकर्षित होतील, आपल्या जवळ येवून आपल्याशी खेळतील, आपल्या सुगंधाने भारावून मनुष्य आपल्याला अत्तराच्या कुपीत जतन करून ठेवेल, स्त्रिया आपल्याला

डोक्यावर मिरवून त्यांच्या सौंदर्यात भर घालतील, अनेक देवघरात आपल्याला देवपूजेचा सन्मान मिळेल, सजावटीसाठी आपली सुंदर आरास मांडली जाईल. एवढं सगळं सुखं, समाधान एखाद्याला देणार आपलं अस्थित्व मग निरर्थक कसं ठरेल. या उलट आपण कुणाच्यातरी उपयोगी पडू शकतो याचा आपण अभिमान बाळगला पाहिजे "

दुसऱ्या कळीला हा वेगळा विचार फारच भावला. स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव झाली आणि आनंद गगनात मावेनासा झाला.

दोन्ही कळयांना पहाटेच्या नवचैतन्याचा सूर गवसला आणि एक एक पाकळी बाजूला सारून कळीचा टवटवीत फुलात कायपालट झाला.

सकाळी माळीकाकांनी ती दोन्ही फुले हळूच तोडली पहिल्या फुलाला देवळात देवाच्या पायावर स्थान मिळाले तर दुसरया फुलाने एका आकर्षक पुष्पगुच्छाची शोभा वाढवली. कळी म्हणून जन्माला आलेल्या दोन गुलाबाच्या फुलांचं आयुष्य समृद्ध झालं.

म्हणूनच दोस्तहो उद्याची काळजी न करता परिस्थिती चांगली-वाईट कशीही असली तरी आनंदाने फुलात रहा. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन ठेवा आणि सदैव फुलासारखं दरवळत रहा.

## शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ

लाडक्या राजकन्येला सुयोग्य वर लाभावा म्हणून राजाने स्वयंवराची घोषणा केली.

राजकन्येच्या स्वयंवराचा दिवस उगवला आणि राजमहाल दुमदुमू लागला.

जागोजागी दिव्यांची आरास, फुलांच्या रांगोळया, सुवासिक अत्तरे, झेंडूची तोरणे या सा-याने वातावरण आगदी प्रसन्न झाले. अनेक देशो- देशीचे शूरवीर योद्धे, राजपुत्र राजदरबारात उपस्थित झाले. राजहत्तीला दरबारातील रिंगणात उभ करण्यात आलं आणि "जो कुणी पुरुष राजघराण्याच्या राज हत्तीची सोंड आणि पुढचे दोन पाय वर करून दाखवेल त्याच्याशी राजकन्येचा विवाह होईल आणि त्याला अर्ध राज्य बक्षीस म्हणून दिलं जाईल." अशी घोषणा झाली.

शक्ती परिक्षणासाठी सगळे सिद्ध झाले आणि स्वयंवर सुरु झालं.

प्रत्येकाला स्वसामर्थ सिद्ध करण्याची संधी देण्यात आली.

पण राजहत्तीसमोर कुणाच काही चालेना आणि हत्तीची सोंड आणि पुढचे दोन पाय काही वर होईनात.

राजाच्या चेहऱ्यावरचे भाव चिंताक्रांत झाले. राजकन्येला रडू कोसळणार एवढ्यात एक सडपातळ शरीरयष्ठीचा ब्राम्हण तरुण सभामंडपी अवतरला.

राजासमोर नतमस्तक झाला आणि एका संधीसाठी प्रार्थना करू लागला. राजाने जड मानाने त्याची प्रार्थना मान्य केली.

संधी मिळताच तो ब्राम्हण हत्ती समोर जाऊन उभा राहिला. हत्तीचा रिंगणाला एक फेरी मारून हत्तीच्या पाठीमागे थांबला. सगळा राज दरबार आता काय होणार या प्रतीक्षेत असताना त्या तरुणाने हत्तीची शेपूट दोनी हातात धरून जोरात खाली ओढली. हत्ती बिचारा कळवळला आणि त्याने जोरात ओरडण्यासाठी आपली सोंड आणि पुढचे दोन पाय वर केले आणि चमत्कार झाला. राजाने ठेवलेला स्वयंवराचा पण पूर्ण झाला, राणीला समाधान आणि राजकन्येला आनंद झाला. आगदी थाटा-मटात राजकन्येचा त्या तरुणाशी विवाह झाला आणि त्याला अर्ध राज्य बक्षीस देण्यात आलं.

राजकन्येच्या विवाहानंतर राजाचे लक्ष कही राजकारभारात लागेना म्हणून त्याने काही वर्षातच उरलेलं अर्ध राज्यही बक्षीस म्हणून देण्याचा निर्णय घेतला आणि राज्यभर तशी दवंडीही पिटवली. पुन्हा राजसभेचं आयोजन झालं, राज हत्तीला रिंगणात उभा करण्यात आलं. " राज हत्तीची मान जो होकारार्थी आणि नकारार्थी हालवून दाखवेल त्यालाच अर्ध राज्य बक्षीस दिल जाईल." अशी घोषणा झाली. अनेक राजे, महाराजे, शूरयोद्धे यांना संधी मिळूनही या ही वेळी पराभव स्वीकारावा लागला आणि सुवर्ण संधीची माळ सगळयात शेवटी ब्राम्हणाच्याच गळयात येउन पडली तसा सगळा दरबार पुन्हा एकदा ब्राम्हनाकडे आशेने पाहू लागला. रिंगणाजवळ जाताच ब्राम्हण आणि हत्तीची नजरा- नजर झाली. ब्राम्हण

हत्तीच्या पाठीवर जाऊन बसला आणि हत्तीच्या कानात हळूच म्हणाला, " मला ओळखलस ???" हत्ती म्हणाला' " हो.", मग पुढे ब्राम्हण म्हणाला, "शेपूट ओढू" , हत्ती म्हणाला "नको". राजाच्या पण पुन्हा पूर्ण झाला, पुन्हा एकदा बुद्धिवादी ब्राम्हणाने अर्ध राज्य जिंकलं आणि शक्तीपुढे बुद्धीचं पारडं पुन्हा जड झालं.

## शर्यत मैत्रीची...!!!!

एक घनदाट जंगल होत वृक्ष-वेलींनी वेढलेलं, पाना-फुलांनी बहरलेलं. निसर्गाच्या अप्रतिम सौदर्याने सजलेलं. अनेक पक्षी प्राणी या जंगलात आपलं घर बांधून राहत होते. अशा जंगलात राहत होता एक शुभ्र ससा. साश्याशेजारी नवीनच घर थाटल होत, ते एका कासवानी. ससा होता गोब-या गोब-या गालांचा, कासव काळयाकुटट कवचाचा. ससा पांढ-या शुभ्र कापसाचा, कासव रखरखीत पावलांचा. ससा लबाड घाऱ्या डोळयांचा, कासव डोळे मिटून पाहिलेल्या स्वप्नांचा, सश्याच्या बुद्धीची दारं बंद, कासव चालायला थोडं संथ. कासवाची बुद्धी, त्याची प्रगल्भता, त्याचं वागण, बोलण या साऱ्याने ससा भारावून गेला होता. सश्याला खूप आनंद झाला होता, खरंच खूप बरं वाटलं कि, आपल्याला आता नवीन मित्र मिळणार. मैत्रीच्या आभाळात सुखाचं फुलपाखरू नव्याने बागडणार. सश्याने कासवाशी मैत्री करण्याचा अनेकदा प्रयत्नही केला. पण कासाव काही मान वर करून चालेना नि सश्याशी काही बोले ना. सश्याच्या प्रयत्नाचा कासवावर काहीच परिणाम होत नव्हता. सश्याने मैत्रीचा हात पुढे केला त्यावर कासवाचे उत्तर, " मैत्री, तुझ्याशी तू देखणा रुबाबदार, माझ्याकडे आहे फक्त अंधार. दोन ध्रुव कधी एकत्र येऊ शकत नाही, तुझ्या नि माझ्यात मैत्रीचे बंध निर्माण होऊ शकत नाहि ...!!!!"

त्यावर ससा म्हणाला,

"नकळतपणे माझे मन

तुझ्या मध्ये गुंतले आहे

आता कळतेय ही ओळख नसून

काहीतरी वेगळे आहे

मी जे अनुभवतोय

ते एक दिवस

तु ही नक्की अनुभवशील,..

मग

कधीतरी तुही माझ्यावर मित्र म्हणून प्रेम करशील...!!!!"

सशाचे बोलणे ऐकून कसावाच्याही मनात साशाबद्दल आपलेपणा निर्माण होऊ लागला. सशाच मैत्रीच फुलपाखरू कासवाच्या खांद्यावर विसावलं होत, प्रेंमाच्या रंगात ते पुरत रंगलं होत.

ससा आणि कासवात मैत्रीचे वारे वाहत होते ही गोष्ट वणव्यासारखी जंगलभर पसरली. त्यांची मैत्री पूर्णत्वाला येऊ नये म्हणून अनेक प्रयत्नही सुरु झाले. जंगलातल्या सगळ्या प्राण्यांनी मिळून एक युक्ती लढवली. ससा आणि कासवात शर्यत लावायची असे एकमत झाले. जिंकणाऱ्या सशाचा स्वभिमान गर्वात बदलेल आणि नवीन राहायला आलेल्या कासवाचा सगळ्या प्राण्यानसमोर अपमान होईल या उद्देशाने शर्यतीचा खेळ ठरला. ही कल्पना जंगलच्या राजाकडूनही मंजूर करून

घेण्यात आली. कासवासाठी नसली तरी साशासाठीहि सत्वपरीक्षा होती. आपलेपणाने जपलेली ही प्रेमाची मैत्री एका क्षणात पणाला लागणार होती.

मग, दुस-या दिवशी सकाळी ससा आणि कासाव ठरल्या प्रमाणे एका ठिकाणी जमले. शर्यत सुरु झाली. ससा भराभर उड्या मारत पुढे गेला. कासव आपले हळू हळू चालत राहीले. थोड्या वेळाने सशाने मागे वळून पाहिले तर कासव अजून मागेच होत. बिच्चारं कासव सगळया प्राण्यांच्या चुकीच्या निर्णयाचं ओझं पाठीवर घेऊन हळू हळू चालत होतं. सश्याला कासवाची खूप दया आली सश्याने मनात विचार पक्का करून निर्णय घेतला,

"आज मी ही शर्यत तुझ्यासाठी हरणार आहे,

तुझ्यासाठी माझी मैत्री पुन्हा सिद्ध करणार आहे."

एवढा मोठ्ठा निर्णय घेतल्यावर सश्याला खूप भूक लागली. मग त्याने आजूबाजूच्या हिरव्या गवतावर मस्त ताव मारला. पोट भरल्यावर एका झाडामागे लपून बसला. सश्याने कासवासाठी पाहिलेलं स्वप्न लवकरच पूर्ण होणार होत म्हणून तो झाडामागून कासवाला हळूच पाहू लागला. कासव मात्र हळू हळू चालतच राहिले. ना वाटेत कुठे थांबले ना झोपले. बघता बघता ते पार डोंगराच्या माथ्यावर पोचले. शर्यत तिथेच संपणार होती ना.... !!!!

एवढ्यात संध्याकाळ झाली आपली मैत्री, आपला विश्वास, आपल प्रेंम मनात साठवून ससा धावत डोंगरमाथ्यावर पोहचला. त्याला हव होत तेच झालं होत. कासव हळू हळू सारं अंतर कापून शर्यतीत पाहिलं आलं होत. अशाप्रकारे ती शर्यत

कासवाने जिंकली. जंगलातल्या सगळ्या प्राण्यांनी कासवाला शाब्बासकी दिली. कासवाने जेव्हा सशाकडे पहिले तेव्हा कासवाला सशाच्या चेहऱ्यावर दिसला तो समाधानाचा आनंद हरून सुद्धा जिंकण्याचा, मैत्रासाठी हरण्याचा.

कारण ........................

जिंकण्याचं सामर्थ्य असून सुद्धा

ससा हरला होता,

आपल्या स्वाभिमान पणाला लावून

तो कासवाची मैत्री मात्र जिंकला होता

आयुष्यातली सारी सुखं कासवाच्या डोळयात दाटली

कासवाला मनापासून सश्याची मैत्री पटली ......!!!!!!!

तेव्हापासून आपल्या प्रत्येकाच्या मनात घर करून

ससा आणि कासव आपल्या मैत्रीच्या बळावर अजूनही एकत्र राहतायत.

स्वतःच दुः खं बाजूला सारून दुसरयाला सुख देतायत.

आयुष्यात ही मैत्री नेहमीच आठवत राहील,

सशा शिवाय कासवाची मैत्री अपूर्ण राहील.

म्हणूनच ............................

अजूनही सशाची आठवण काढताच कासवाच नाव साश्यासोबत जोडलं जातं.

दोन भिन्न व्यक्तींचं नात तेव्हा पूर्णत्वाला येत.



# निसर्ग नियम

गोष्ट जुनी असली तरी विचार आजही झालाच पाहिजे. प्राणी आणि पक्षी यांच्या पाठीवर निसर्गाने पृथ्वीवर "मनुष्यप्राणी" जन्माला घातला. सगळ्या हुशार आणि बुद्धिमान असा हा मनुष्यप्राणी. निसर्गाने जे जे जन्माला घातलं त्या प्रत्येकासाठी केले काही नियम. निसर्गाचा ठेवा जपला जावा आणि निसर्ग सौंदर्य अबाधित राहावं म्हणून हे नियम. मनुष्य, प्राणी, पक्षी यांना जगण्यासाठी जे जे लागेल ते ते सारं निसर्गाकडूनच पुरवलं जायचं. मानवाच्या अन्न , वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजांना निसर्गाने निस्वार्थीपणे तथास्तु म्हंटल.

पूर्वी समुद्र किनारी वाळू ऐवजी मीठ पसरलेलं असायचं आणि समुद्राचं पाणीही अगदी अमृतासारखं गोड असायचं. निळाशार तो समुद्र, त्याचं अमृततुल्य पाणी आणि त्या किनारी पसरलेलं शुभ्र मीठ म्हणजे निसर्गाची किमयाच. सजीवांची तहान भागवण्यासाठी याच पाण्याचा सर्वतोपरी वापर होऊ लागला.

मानवाची उत्क्रांती झाली आणि अन्नाला चव यावी म्हणून तो या मिठाचाही वापर करू लागला. पण, मीठ आणि पाणी वापराचा निसर्ग नियम असा कि, " अन्नाला लागेल तेवढेच मीठ आणि पाणी समुद्रावरून न्यायचे." नियमाचा उद्देश असा कि निसर्गाचा कमीत कमी -हास होईल आणि निसर्ग सौंदर्य जपलं जाईल.

पण जशी जशी बुद्धीची वाढ झाली, तसा हा मानव अहंकारी, लोभी आणि स्वार्थी होऊ लागला. स्वतः च्या स्वार्थासाठी मानवाने हा नियम मोडला. निसर्गाने

जशी क्रिया तशीच प्रतिक्रिया दिली. समुद्रकिनाऱ्यावरचे सारे मीठ समुद्रात वाहून गेले आणि उरली ती फक्त वाळू . मीठ पाण्यात विरघळल्यामुळे समुद्राचे पाणी खरट झाले. इतके खारट कि ते पिण्यायोग्यही राहिले नाही. तेव्हापासून समुद्राचं पाणी खारट  झालं. आजही खारट झालेलं समुद्राचं पाणी अनेक प्रक्रिया करून आपल्यला पिण्यायोग्य बनवावं लागतंय.

निसर्गाच्या बाबतीत बेसुमार तोडली जाणारी झाडे, त्यामुळे होणारी जमिनीची धूप, वाढणारे तापमान, अपुरा पाऊस, बिघडलेलं निसर्ग चक्र असे एक न अनेक नियम आपण मोडलेत.

निसर्गाला आपण नेहमीच गृहीत धरलंय.निसर्गावर नियंत्रण ठेवण्याचा आपला प्रयत्न हा त्या निसर्गाचा अपमान आहे. कदाचित म्हणूनच निसर्ग विविध रूपांनी आपल्याला हेच पटवून देत असतो कि आपण या निसर्गाचा भाग म्हणून नगण्य आहोत.

या निसर्गावर विजय मिळवण्याची आपण कल्पना तरी कशी करू शकतो. आपण जर काही करू शकतो तर निसर्गाने दिलेलं हे दान जपू शकतो, निसर्ग नियम पालन करू शकतो आणि त्या अविरत उर्जेसमोर समर्पित होऊ शकतो.

## "इंद्रधनुष्य"

शीतयुग उलटले आणि शुभ्रवर्णी वसुंधरा शुभ्रवस्त्र परिधान करून ब्रम्हलोकी जगतनिर्माता ब्रम्ह देवासमोर येऊन उभी राहिली. ब्रम्ह देवाने तिचे स्वागत केले नि म्हणाले, " सांग वसुंधरे, काय इच्छा आहे तुझी ?"

यावर वसुंधरा उत्तरली " देवा, मला नवचैतन्य प्रदान करावं, जे स्व निर्मित असावं. "

ब्रम्ह देव तथास्तु म्हणाले आणि शुभ्रवर्णी वसुंधरेच्या कायेतून जन्म झाला रंगांचा.

तांबड्या लाल रंगाने तिच्या भाळी कुंकवाचा आकार घेतला.

नारिंगी नक्षीदार रंगाने तिचे हात रंगून गेले.

पिवळया रंगाने गळयात, हातात सुवर्णालंकार आकाराला येऊ लागले.

हिरव्या रंगाच्या बांगड्या हातात खळखळू लागल्या.

निळया आकाशी रंगाचा शालू परिधान करून वसुंधरेच रूप अजूनच मनमोहक वाटू लागलं.

परवा आणि जांभळा रंगाच्या हिरे मणिकांनी सुवर्णालंकार झगमगू लागले.

बघता बघता वसुंधरेचा सौंदर्यवती अप्सरेत कायाप्रवेश झाला.

वसुंधरेने स्व कायेतून अशा या सप्तरंगी सात भावंडांना जन्म दिला.

सार्‍यां रंगांमध्ये एकमेकांबद्दल वेगळीच आत्मिक ओढ.

एकमेकांबद्दल अत्यंत प्रेंम, आदर, आपुलकी आणि जिव्हाळा.

कुठेही स्वतःच वेगळेपण सिद्ध करण्याची धडपड नाही, स्वतः बद्दल कसलाच गर्व नाही कि कुणाशी स्पर्धा नाही. सगळाच आनंदी आनंद

निळाशार समुद्र, हिरवी गार झाडं , रंगीबेरंगी फुलं, तांबडा लाल सूर्य त्याची पिवळी कोवळी सूर्यकिरणं, गर्द निळे आकाश

हे सारं सृष्टी सौंदर्य लेवून वसुंधरा धन्य झाली, तिने मोनोमन ब्रम्ह देवाचे आभार मानले.

या सातही मुलांसोबत वसुंधरा आनंदात होती.

आपल्या लाडक्या वसुंधरेच्या सौंदर्यात भर घातल्यामुळे ब्रम्ह देवालाही या सप्तरंगांचे फार कौतुक वाटले.

म्हणून मग ब्रम्ह देवाने या सातही भावंडांना ब्रम्हलोकी बोलावून घेतले

आणि बक्षीस म्हणून त्यांना वर मागण्यांस सांगितले

या सातही भावंडांनी एकमेकांच्या हातात हात घातला आणि एकमुखाने " आम्हाला सदैव एकमेकांशी जोडून ठेव. आमचा एकमेकांच्या हातातला हात आणि ही साथ आयुष्य भर अशीच राहूदे ." असा वर मागितला.

ब्रम्हादेव तथास्तु म्हणाले ................!!!!!

आणि क्षितिजावर जन्म झाला लक्षवेधी "इंद्रधनुष्याचा "

अंधारातून स्वयंप्रकाशी इंद्रधनुचे सप्तरंग उलगडले.

थोडे दृष्टीच्या आलीकाडले, अन थोडे पलीकडले

तेव्हापासून हे इंद्रधनुष्याचे सप्तरंग आपल्याला आपलेपणाच्या प्रेंमाची आठवण करून देतायत.

सूर्यकिरणांचा पाण्याशी मेळ होतो आणि आजही हे सप्तरंग आपल्याला एकमेकांना सांभाळून घेऊन एकात्मतेचा संदेश देतात



आपणही या इंद्रधानुष्याकडून इतरांबरोबर असताना स्वतःच वेगळेपण सिद्ध करण्यापेक्षा इतरांच्या विचारांचा आदर करायला शिकले पाहिजे. या गुणाने आपण स्वतः बरोबर इतरांचाही विकास साधू शकू.

## कष्टाचे बळ , मिळते फळ

एक आटपाट नगर होते. त्या नगराचे नाव स्वप्ननगरी. या स्वप्नगरीवर राज्य करीत होता, राजा स्वप्निल आणि त्या राजाची लाडकी राजकन्या स्वप्नाली. या नगरात अनेक स्वप्न वास्तव्याला होती. काही शूर, काही शांत, काही हसरी, काही रडवी, काही चांगली काही वाईट, काही स्वप्न झोपेत हळूच खुद्कन हसवायची, काही दचकून जाग करायची, चॉकलेट पासून खेळण्यां पर्यंत सगळे हट्ट पुरवायची, जिथे जायची इच्छा आहे तिथे फिरायला न्यायची, जे हवंय ते मिळाल्यावर चेहऱ्यावर एक समाधानाचा आनंद द्यायची. राजकन्या या सगळया स्वप्नसुखापासून वंचित होती. राजकान्येला स्वप्नच पडायची नाहीत, कारण मुळात तिला शांत झोपच यायची नाही. राजमहालात तिच्या दिमतीला सतत तिच्या सोबत नोकर-चाकर असंत. सगळयाच गोष्टी हातात मिळत गेल्यामुळे तिचा स्वभाव आळशी बनला, तिने कधीही कोणतेच काम केले नाही कि, इकडची काडी तिकडे केली नाही.

थोडी मोठी झाल्यावर राजाने राजकन्येला ज्ञान प्राप्त करण्यासाठी राजगुरूंना आमंत्रण दिलं. राजगुरूंना राजकन्येच्या या आळशी स्वभावाबद्दल चांगलीच माहिती होती त्यावर उपाय म्हणून त्यांनी ते आमंत्रण न स्वीकारता राजकन्येलाच गुरुकुलात येऊन राहावं लागेल अशी अट घातली. राजापुढे अट मान्य करण्यावाचून काहीच पर्याय नसल्यामुळे त्याला राजकन्येला राजमहालापासून दूर

पाठवणे भाग पडले. गुरुकुलाची दिनचर्या ठरलेली होती त्यामुळे तिथे स्वतःला बदलणे राजकन्येला खूप कठीण गेले.

गुरुकुल मध्ये तिला सगळी लवकर उठावे लागे. झाडलोट, सडा सारवण, प्राण्याची निगा राखणे, झाडांना पाणी देणे, स्वयंपाकात मदत करणे अशी अनेक कामे आटपेपर्यंत रात्र व्हायची आणि राजकन्या दमून जायची.

दिवसभर शीण आल्याने रात्री एका छोट्याशा चटईवरही तिला शांत झोप लागायची.

राजकन्या झोपल्यावर स्वप्न हळुवार तिच्या अंतरमनात शिरायची, तिला खूप हसवायची, स्वप्नसुखाचा आनंद द्यायची. झोप पूर्ण झाल्याने राजकन्येची गुरुकुलात दररोज सुंदर आणि उत्साही सकाळ व्हायची.

हळू हळू राजकन्येला कष्टाचं महत्व पटलं. गुरुकुल संपवून राजमहालात आल्यावर राजकन्या सगळी कामं स्वतःची स्वतः करायची, आणि सुंदर स्वप्नांची वाट पाहत शांत झोपी जायची.

राजाने राजकन्येच्या आळशी स्वभावावर उपाय शोधून काढल्यामुळे राजगुरूंचे आभार मानले आणि काही वर्षांने लाडक्या राजकन्येचा एका शूर राजकुमाराशी लग्न लावून दिले.

म्हणूनच मित्रहो शक्यतो स्वतःची कामे स्वतः करा, शांत झोपा, सुंदर स्वप्न पहा करणं आपली स्वप्नं आपल्या आयुष्याला योग्य दिशा देतात.

## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

**एक प्रसन्न अनुभव**